पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २

**सभावृत्तांत**

दिनांक - **२१/१०/२०१६** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२१/१०/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.आल्हाट मंदा उत्तम - सभापती**
२. मा.नंदा विकास ताकवणे
३. मा.भारती फरांदे
४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
५. मा.बाबर शारदा प्रकाश

या शिवाय मा.डोईफोडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.नंदा ताकवणे अनुमोदक – मा.शारदा बाबर

सध्या विधान परिषदेची आचारसंहिता लागू झालेली असलेने दि.**२१/१०/२०१६** ची मा.विधी समितीची पाक्षिकसभा शुक्रवार दि.**०४/११/२०१६** रोजी दुपारी **२.४५** वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** शुक्रवार दि.**०४/११/२०१६** रोजी दुपारी **२.४५** वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( आल्हाट मंदा उत्तम )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २

**सभावृत्तांत**

**(** दिनांक २१/१०/२०१६ ची तहकूब सभा **)**

दिनांक - **०४/११/२०१६** वेळ - दुपारी **२.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दि.२१/१०/२०१६ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक **०४/११/२०१६** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.आल्हाट मंदा उत्तम - सभापती**
२. मा.पाडाळे निता विलास
३. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
४. मा.बाबर शारदा प्रकाश

या शिवाय मा.डोईफोडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.निता पाडाळे अनुमोदक – मा.गोरक्ष लोखंडे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.विधी समितीची दि.**०४/११/२०१६** ची तहकूब सभा शुक्रवार दि.**१८/११/२०१६** रोजी दुपारी **२.४५** वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** शुक्रवार दि.**१८/११/२०१६** रोजी दुपारी **२.४५** वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( आल्हाट मंदा उत्तम )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २

**सभावृत्तांत**

**(** दिनांक २१/१०/२०१६ व ०४/११/२०१६ ची तहकूब सभा **)**

दिनांक - **१८/११/२०१६** वेळ - दुपारी **२.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दि.०४/११/२०१६ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक **१८/११/२०१६** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.आल्हाट मंदा उत्तम - सभापती**
२. मा.नंदा विकास ताकवणे
३. मा.आर.एस.कुमार
४. मा.भारती फरांदे
५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
७. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
८. मा.बाबर शारदा प्रकाश

या शिवाय मा.डोईफोडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.भारती फरांदे अनुमोदक – मा.नंदा ताकवणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.विधी समितीची दि.**१८/११/२०१६** ची तहकूब सभा शुक्रवार दि.**०२/१२/२०१६** रोजी दुपारी **२.४५** वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** शुक्रवार दि.**०२/१२/२०१६** रोजी दुपारी **२.४५** वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( आल्हाट मंदा उत्तम )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २

**सभावृत्तांत**

**(** दिनांक २१/१०/२०१६, ०४/११/२०१६ व १८/११/२०१६ ची तहकूब सभा **)**

दिनांक - **०२/१२/२०१६** वेळ - दुपारी **२.४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दि.**१८/११/२०१६** ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक **१२/१२/२०१६** रोजी दुपारी **२.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.आल्हाट मंदा उत्तम - सभापती**
२. मा.नंदा विकास ताकवणे
३. मा.आर.एस.कुमार
४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम
५. मा.बाबर शारदा प्रकाश

या शिवाय मा.डोईफोडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक **०२/०९/२०१६** व **०७/०९/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २४)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**आ)** दिनांक **१४/१०/२०१६** रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक – ०४ विषय क्रमांक – ०१
दिनांक – ०२/१२/२०१६ विभाग – प्रशासन
सुचक – मा.नंदा ताकवणे अनुमोदक – मा.आर.एस.कुमार
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/६६७/२०१६, दि.०७/०९/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'कान-नाक-घसा तज्ञ'अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०७/२०१५ रोजी वर्तमानपत्रात आणि

महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.२३९/२०१५ प्रसिध्द करुन तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. ' कान-नाक-घसा तज्ञ ' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.२०/१२/२०१५ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेतउमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.२८/०३/२०१६ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे ' कान-नाक-घसा तज्ञ ' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.२१/०७/२०१६ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.तेलंग वृषाली राहूल यांना खुल्या प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये ' कान – नाक - घसा तज्ञ ' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेअधीन नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे. डॉ.तेलंग वृषाली राहूल यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये ' कान – नाक - घसा तज्ञ ' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ०५ | विषय क्रमांक – ०२ |
| दिनांक – ०२/१२/२०१६ | विभाग – निवडणूक |
| सुचक – मा.आर.एस.कुमार | अनुमोदक – मा.गोरक्ष लोखंडे |

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.निवडणूक/३/कावि/१०८/२०१६, दि.१२/०९/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०१७ मध्ये होत आहे. सदर महानगरपालिकेच्या निवडणूकीकरीता मा.भारत निवडणूक आयोगाकडील विधानसभेच्या याद्यां वरुन महापालिकेच्या मतदार याद्या तयार कण्यात येत असतात. महानगरपालिका कार्यक्षेत्रात २०५-चिंचवड, २०६-पिंपरी, २०७-भोसरी तसेच २०३-भोर विधानसभा अंतर्गत ताथवडे गाव हे भाग समाविष्ट आहेत. याकामी दिनांक - ०१/०१/२०१७ रोजी ज्या नागरिकांचे वय १८ वर्षे पूर्ण होत आहे. अशा नागरिकांना आपले नाव मतदार यादीत मतदार म्हणून नोंदविता येणार आहे. तसेच

कोणताही पात्र नागरिक अथवा पात्र मतदार मतदार यादीत नाव नाही म्हणून मतदानापासून वंचित राहणार नाही याकामी मा.भारत निवडणूक आयोगातर्फे **मतदार नोंदणी अभियान कार्यक्रम दिनांक - १५ सप्टेंबर २०१६ ते दिनांक - १४ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेले आहे. तसेच दिनांक १८/०९/२०१६ (रविवार) व दिनांक ०९/१०/२०१६ (रविवार) या दोन्ही दिवशी विशेष मोहिमेचे आयोजन करणेत आलेले आहे.** या कार्यक्रमाअंतर्गत पात्र नागरिकांना त्यांचे नाव मतदार यादीत नोंदविणे तसेच मतदार यादीतील नाव, वय, लिंग, इ. चुकांची दुरुस्ती करणे तसेच मयत, दुबार, स्थालांतरण इत्यादि नावे वगळणी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. त्याकामी महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालये तसेच शहरातील १४ महाविद्यालयांमध्ये ०१ ऑगस्ट २०१६ पासून मतदार सहायता केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. त्यांचेमार्फत फॉर्म नं.६ नवीन नोंदणी, फॉर्म नं.७ नाव वगळणी, फॉर्म नं.८ नाव, पत्ता, तपशील दुरुस्ती, फॉर्म नं.८अ स्थलांतरण हे फॉर्मस् वाटप व स्विकृती करण्यात येत असल्याबाबत माहितीचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०६ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०२/१२/२०१६ विभाग – क क्षेत्रीय स्थापत्य

सुचक – मा.नंदा ताकवणे अनुमोदक – मा.शारदा बाबर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/कक्षे/कावि/८८९/२०१६, दि.१३/१०/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

प्रभाग क्र.४० खराळवाडीमध्ये बालसंस्कार केंद्र व परिक्षा मार्गदर्शन केंद्र इमारत बांधणे लेखाशिर्ष JNNURM / केंद्रशासन योजना या कामातून सदरचे काम करणे आवश्यक आहे. या कामाची पाहणी करुन अंदाजपत्रक तयार करणेत आले असून त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-१६ च्या नुसार दर सुचीनुसार घेण्यात आहे आहे. सदर कामाची प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये – ३७,५०,०००/- एवढी असून त्याची अंदाजपत्रकीय र.रु.३७,५०,०००/- एवढी येत आहे. सदर अंदाजपत्रकाचा सन २०१६-१७ या वर्षाच्या बजेटमध्ये समावेश करणेत आलेला असून या कामावर होणा-या खर्चाची तरतूद अंदाजपत्रकातील पानांक ६२३ अ.क्र.१८ वर **JNNURM / केंद्रशासन योजना** या लेखाशिर्षावरती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या रकान्यात शून्य दर्शविणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकातील पान क्र.६२३ अनु.क्र.१८ प्रभाग क्र.४० खराळवाडीमध्ये बालसंस्कार केंद्र व परिक्षा मार्गदर्शन केंद्र इमारत बांधणे या कामासाठी र.रु.३७,५०,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकामध्ये सुचविणेत आलेल्या प्रभाग क्र.१ रुपीनगर मध्ये दिशादर्शक कमान बांधणे या कामाची निविदा काढणेत आलेली आहे. (निविदा क्र. २०/३९ – २०१६-१७, निविदा र.रु.२२,४०,४५४/-) परंतु प्रभाग क्र.१ रुपीनगर तळवडे हा भाग रेड झोन बाधित असलेने सदर कमानीचे काम करणे शक्य होणार नाही. त्यामुळे प्रभाग क्र.१ मध्ये कमानीच्या कामातून स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच फ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील सन्मा.सदस्यांनी

अंदाजपत्रकामधील सुचविणेत आलेल्या विकास कामामध्ये निविदा प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर विविध कामामध्ये सन्मा.सदस्यांच्या व नागरिकांच्या मागणीनुसार तसेच निविदा कार्यवाहीसाठी लागणा-या दिर्घ कालावधीमुळे कामाच्या व्याप्तीमध्ये बदल करणे भाग पडते. सबब त्यामुळे कामाचा प्राधान्यक्रम बदलतो त्यामुळे फ क्षेत्रिय कार्यालयातील विकास कामांच्या व्याप्तीमध्ये बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच नवी सांगवी पाण्याच्या टाकीचे रंगसफेदी करणे व इतर स्थापत्य विषयक व सुशोभिकरणाची कामे करणे या कामाचा आदेश मे.बालाजी इंजिनिअर्स यांना दि.०४/०९/२०१४ रोजी देणेत आलेला आहे. सदर कामांतर्गत नवी सांगवी येथील पाण्याच्या टाक्यांचे रंग सफेदी करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेचा अंतर्भाव होता. दरम्यानच्या काळात दापोडी येथील उंच टाक्यांचे आवारात ५ लक्ष लि. क्षमतेची जमिनी खालील टाकीचे (संपवेलचे) बांधकाम पूर्ण झाले होते. सदर दापोडी येथील जमिनी खालील टाकीचे (संपवेलचे) कामामध्ये पंपहाऊसचा अंतर्भाव नसल्याने त्या कामामधून सदर पंप हाऊसचे काम करणे शक्य नव्हते. दापोडी येथील पाणीपुरवठयामध्ये सुधारणा करणेसाठी सदर जमिनी खालील टाकीवर (संपवेलवर) पंप हाऊस बांधणे अत्यंत आवश्यक व तातडीचे होते. या परिस्थितीमध्ये सदर कामामधून सदर दापोडी येथील जमिनी खालील टाकीवर पंप हाऊस बांधून घेणे अनिवार्य होते. त्यानुसार आवश्यक बाब म्हणून सदरचे काम करुन घेणेत आलेले आहे. सदर पंपहाऊसचे काम, कामाची तातडी, आवश्यकता लक्षात घेऊन निविदा क्र.२०/०८/२०१३-१४ या कामामधून दापोडी येथील पाण्याच्या टाक्यांच्या आवारातील संपवेलवर पंपहाऊस बांधणेत आलेले आहे. तसेच स्थापत्य विषयक कामेही करण्यात येत आहेत. त्यामुळे निविदा क्र.२०/०८/२०१३-१४ च्या कामामध्ये स्थानबदल करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच काळेवाडी एम.एम.स्कूल ते पवना नदीपर्यंतच्या रस्त्यावर सबवे बांधणेचे काम बीआरटीएस विभागामार्फत मे.क्लीन्सी कन्स्ट्रक्शन हे ठेकेदार निविदा क्र.१४/५-२०१५/१६ अन्वये करीत आहेत. सदर कामामध्ये म्युरल बसविणे, स्टँप काँक्रीट करणे इ.बाबींचा मुळ अंदाजपत्रकात समावेश आहे. सदर निविदा दर १६.२२ टक्के कमी असा आहे. तथापि सदर बाबी अंमलात न आल्याने निविदा रकमेइतका खर्च होणार नसून निविदा रकमेमध्ये बचत होत आहे. मनपा क्षेत्रातील सांगवी फाटा येथे ग्रेड सेपरेटर, फ्लाय ओव्हर, सबवे व पादचारी पूल बांधणेचे काम निविदा क्र.३०/१-२०१२/१३ अन्वये चालू असून सदर कामामध्ये CQAE गेटजवळील पादचारी भूयारी मार्ग बांधणेचा समावेश असून त्यामध्ये बस स्टेशनमध्ये ये-जा करणेच्या व फुटपाथवर ये-जा करणेच्या रॅम्पचा समावेश आहे. तथापि सांगवी फाटयाकडील ये-जा करणेसाठी जीन्याचा समावेश नसून तो करणे आवश्यक आहे. तसेच सांगवी फाटयाकडील स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणे, ग्रेड सेपरेटरमधील एका बाजूस असलेल्या फुटपाथ प्रमाणेच दुस-या बाजूसही फुटपाथ करणे तसेच सांगवी फाटा चौकातील डांबरीकरण करणे आवश्यक आहे. तरी काळेवाडी एम.एम.स्कूल ते पवना नदीपर्यंतच्या रस्त्यावर सबवे बांधणेच्या कामात होणा-या बचतीमधून वर उल्लेख केलेली सांगवी फाटा येथील कामे करणेकामी होणा-या स्थलबदलास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सार्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( आल्हाट मंदा उत्तम )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६३८/२०१६
दिनांक : ०२/१२/२०१६

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2016 sub committee sabhapati.doc